**BDC LIBRARY**

**New Paper Clipping**

**A.Y. 2023-2024**

# श्रमसंस्कार शिबिरातून सामाजिक बांधिलकी व सेवाभाव निर्माण होतो : सत्यजितसिंह पाटणकर

▲ पाटण, दि. २७ : युवकांचे प्रभावी व्यक्तिमत्त्व घडविण्याचे कार्य शिक्षण क्षेत्रातून होते. त्याद्वारे तरुणांमध्ये सामाजिक बांधिलकीची जाण व सेवाभाव निर्माण करण्याचे कार्य महाविद्यालयीन स्तरावर राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमातून होत असते. श्रमसंस्कार शिबिरातून प्रत्यक्ष मिळालेल्या अनुभवातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो, असे मत सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक श्रीमंत सत्यजितसिंह पाटणकर यांनी व्यक्त केले.

पाटण येथील बाळासाहेब देसाई महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोप कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी कोयना एज्युकेशन सोसायटीचे जनरल सेक्रेटरी श्रीमंत अमरसिंह पाटणकर होते.

यावेळी माजी सभापती राजाभाऊ शेलार, डोंगरी विकास समितीचे सदस्य शंकरराव शेडगे, प्राचार्य डॉ. एस. डी. पवार, शिबिर संचालक डॉ. जी. एस. पट्टेबहादूर, टोळेवाडी गावाचे सरपंच सिद्धार्थ देवकांत, माजी सरपंच नारायण डिगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

सत्यजितसिंह पाटणकर म्हणाले, देशाचा आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक विकास घडविण्यात राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमाची महत्त्वाची भूमिका आहे. देशातील युवाशक्तीला नवचेतना देण्याचे कार्य देशातील राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमातून होते.



मार्गदर्शन करताना सत्यजितसिंह पाटणकर. व्यासपीठावर अमरसिंह पाटणकर, राजाभाऊ शेलार, शंकरराव शेडगे, डॉ. एस. डी. पवार व मान्यवर. (नितीन खैरमोडे)

अध्यक्षस्थानावरून बोलताना श्रीमंत अमरसिंह पाटणकर म्हणाले, माझ्यासाठी नव्हे, तर तुमच्यासाठी हे ब्रीदवाक्य लक्षात घेवून राष्ट्रीय सेवा योजनेची स्वयंसेवक सेवेची मूल्ये आणि सामाजिक भान ठेवून समाजसेवेसाठी तत्पर असतो. आपले उज्वल भविष्य गाठत असतानाच समाज व राष्ट्राला आपण काही देणे लागतो म्हणून फूल ना फुलाची पाकळी या माध्यमातून राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमाद्वारे राष्ट्रसेवा करण्याचे कार्य महाविद्यालयीन युवक करत असतो. समाजात सामाजिक जाण देणारा, जनजागृती करणारा, तसेच राष्ट्र व समाजाप्रती जबाबदारीचे कार्य करणारा राष्ट्रीय सेवा योजना हा भारत सरकारचा अभिनव उपक्रम आहे.

राजाभाऊ शेलार म्हणाले, राष्ट्रीय सेवा योजना ही संकल्पनेतील सेवा आणि त्याग हे शब्द युवकांच्या आयुष्यातील सेवेचे महत्त्व अधोरेखित करतात. शिक्षण क्षेत्रात कनिष्ठ स्तरापासून ते उच्चशिक्षण क्षेत्रातील राष्ट्रीय सेवा योजना या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी शंकरराव शेडगे, नवनियुक्त सरपंच सिद्धार्थ देवकांत यांनी मनोगत व्यक्त केले. श्रमसंस्कार शिबिरातील स्वयंसेवकांनी शिबिरात आलेले अनुभव मनोगतातून व्यक्त केले. माजी सरपंच नारायण डिगे यांनी टोळेवाडी गावचा रस्ता पूर्ववत करून दिल्याबद्दल सर्वांचे आभार मानले. शिबिर संचालक डॉ. गजानन पट्टेबहादूर यांनी अहवाल वाचनात महविद्यालयातील विद्यार्थ्यांनी केलेले सामाजिक उपक्रम व विशेष श्रम संस्कार शिबिराची माहिती दिली. त्यानंतर एन.एस.एस.मधील उत्कृष्ट कार्य केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. प्राचार्य डॉ. एस. डी. पवार यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. भरतकुमार जाधव यांनी आभार मानले. डॉ. संदीप तडाखे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास प्रा. बळीराम लोहार, प्रा. दिनेश रेवडे, प्रा. श्रीगणेश गायकवाड, प्रा. आय. एस. साळुंखे, प्रा. आर. आर. नवले यांच्यासह टोळेवाडीचे ग्रामस्थ उपस्थित होते.

### एन. एस. एस. कडून रस्त्यासाठी आर्थिक मदत...

कोयना एजुकेशन सोसायटी व बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण हे नेहमीच सामजिक उपक्रमात अग्रेसर राहिले आहे. याचे उदाहरण म्हणजे एन. एस. एस. विभाग यांच्याकडून टोळेवाडी रस्त्यासाठी श्रमदान तर करण्यात आलेच, त्याच बरोबर रस्त्यासाठी रोख १५ हजार रुपये देण्यात आले. याबद्दल टोळेवाडी ग्रामस्थांनी सर्वांचे विशेष आभार मानले.